Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 19/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष

## खगोलशास्त्रज्ञ, लेखक डॉ. जयंत नारळीकर



डॉ. जयंत विष्णू नारळीकर हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. गणिताचा वारसा त्यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्याचे वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणिततज्ज्ञ होते. वाराणशी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते. डॉ. नारळीकरांचं संस्कृतवरही प्रभुत्व आहे. तो वारसा त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर ह्या संस्कृत विदुषी होत्या. डॉ. नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणशी येथे झाले. तेथूनच सन १९५७ साली त्यांनी विज्ञानाची पदवी प्राप्त केली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रीज विद्यापीठात गेले. तेथे त्यांनी बी.ए. एम.ए. आणि पी.एचडी.च्या पदव्या मिळवल्या. त्या काळात त्यांनी रँग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल व इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांनी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर फ्रेड हॉईल यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एचडी. केली. सर फ्रेड हॉईल डॉ. नारळीकरांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित झाले. त्यामुळे १९६६ जेव्हा हॉईड यांनी केंब्रीज येथे 'इन्स्टिट्यूट ऑफ थिऑरॉटीकल ॲस्ट्रॉनॉमी' नावाची जी स्वतःची संस्था सुरू केली, त्यात डॉ. नारळीकरांचाही महत्वाचा वाटा होता. १९६६ ते १९७२ पर्यंत ते या संस्थेशी निगडित होते.

त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून पद स्वीकारले. कालांतराने १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्त झाली. डॉ. नारळीकर यांनी मराठी साहित्यातही फार मोलाची भर घातली. त्यांच्या 'यक्षांची देणगी' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. १९६५ साली त्यांना पद्मभूषण तर २००४ साली पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आले. जयंत नारळीकर यांचे २० मे २०२५ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 19, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401